


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले


संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार ५ ऑक्टोबर २०२४ | अंक ३०० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

# ही सुरुवात आहे, अनेक धक्के बसतील; शरद पवाराचा भाजपला इशारा

हर्षवर्धन पाटलांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याची घोषणा केली आणि ही सुरुवात आहे. यापुढेही यापुढेही भाजपला अनेक धक्के बसतील असा इशारा शरद पवारांनी दिला आहे. गेल्या काही दिवसांत शरद पवारांनी भाजपला 2 झटके दिले आहेत. कागलमध्ये समरजित घाटगेंनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटलांनीही तुतारी हाती घेण्याचा निर्णय जाहीर केला. वडगाव शेरीचे भाजपचे माजी आमदार बापूसाहेब पठारेंनीही पवारांचा हात पकडलाय. चंदगडचे भाजप नेते शिवाजी पाटीलही शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या संपर्कात आहेत. अकोलेत मधुकरराव पिचड आणि वैभव पिचडही शरद पवारांकडे परतणार असल्याची चर्चा आहे. ज्या ठिकाणी शिंदेंची शिवसेना किंवा अजित पवारांच्या राष्ट्रवादीला सीट जाणार, त्या मतदारसंघाचे भाजपचे इच्छुक नेते, शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडे जाण्याची शक्यता आहे आणि तशी सुरुवातही झाल्याचं





दिसतं आहे. भाजपच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत, हर्षवर्धन पाटलांनी आधी कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला आणि नंतर पत्रकार परिषदेत तुतारी हाती घेणार असल्याचं पाटलांनी जाहीर केलं. 6 किंवा 7 तारखेला इंदापुरात कार्यकर्त्यांचा भव्य मेळाव्यात हर्षवर्धन पाटलांचा शरद पवारांच्या उपस्थितीत प्रवेश होणार आहे..मात्र भाजपला सोडण्याचा निर्णय फडणवीसांशी बोलूनच घेतल्याचंही हर्षवर्धन पाटलांनी सांगितलं आहे. 2019च्या विधानसभा निवडणुकीआधी हर्षवर्धन पाटील काँग्रेसमधून भाजपात आले होते..त्यामुळं त्यावेळी अवघ्या 3100 मतांनी राष्ट्रवादीच्या दत्ता मामा भरणेंकडून पराभव झाला...आता तेच भरणे मामा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत असून त्यांच्याशीच हर्षवर्धन पाटलांचा दुसऱ्यांदा सामना होईल. आता हर्षवर्धन पाटलांनी भाजपला सोडून शरद पवारांकडे जाण्याचा निर्णय घेतल्यानं 2 वर्षांआधीचा त्यांचा व्हिडीओ व्हायरल होतोय...ज्यात भाजपात आल्यानं शांत झोप लागते...चौकशी बिवकशी काही नाही, असं हर्षवर्धन म्हणाले होते..त्यामुळं आता पवारांकडे आल्यावर शांत झोप लागेल का ? या प्रश्नावर पाटलांनी नो कमेंट्स म्हटलं. अद्याप निवडणुकीची घोषणा आणि महायुती तसंच महाविकास आघाडीचं जागा वाटपही झालेलं नाही. त्यामुळं इनकमिंग आणि आऊटगोईंगची जोरदार इनिंग सुरु झालेली नाही. मात्र भाजपला अनेक धक्के बसतील हे पवारांनी सूचकपणे सांगितलं आहे.

## पाटोदा (बे) जिल्हा परिषद शालेय शिक्षण समितीची निवड चुकीच्या पध्दतीने पालकांचा विरोध असतांना केली

### मुख्याध्यापक आणि केंद्र प्रमुख कोणाचे गुलाम ?

दैनिक लोकआरंभ//
बीड प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाटोदा (बे ) जिल्हा परिषद शाळेतील शालेय शिक्षण समितीची निवड चुकीच्या पद्धतीने पालकांचा विरोध असताना केल्याची तक्रार तेथील पालकांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भात पाटोदा बे, येथील पालकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. ४ ऑक्टोबर रोजी पालक बैठक आयोजित करण्यात आली होती. अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड पालकांमधून करायची असताना गुप्त मतदान पद्धतीने वर्गप्रमाणे सदस्य निवडकरायची असे पालकांनी सुचवले. परंतुकेंद्रप्रमुख मुख्याध्यापक यांनी चुकीच्या पद्धतीने पालकांचा विरोध असताना समितीची निवड केली निवडप्रक्रिया सुरू असताना कोणाचा तरी फोन आला आणि नंतर त्या वर्गाची प्रक्रिया बंद केली असा आरोप पालकांनी केला आहे. एकूण ३२ पालक असताना त्यावैकी वीस पालकांनी निवड प्रक्रियेवर आक्षेप नोंदवला. या संदर्भात या पालकांनी केंद्रप्रमुखांकडे तक्रार केली असता तुम्हाला कुठे जायचे तेजा मी मख्या पद्धतीने निवड करणार असे सांगितले, सर्व पालक निघून गेल्यानंतर निवडप्रक्रिया कोणाच्यातरी सांगण्यावरून घेतली असा आरोप पालकांनी केला आहे. पात्तकांना मान्य नसताना केलेली निवड रद्द करावी अन्यथा आम्ही आत्मदहन करू असा इशारा पालकांनी दिला आहे. या सर्व प्रकरणात झालेल्या प्रक्रियेची चौकशी करावी, संबंधित सर्व अधिकाऱ्यांचे फोन रेकॉर्ड तपासून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.



बीड : जिल्ह्याच्या माजी खासदार, लोकनेत्या स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या स्मृतीदिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरातील समाधीस्थळावर जाऊन अभिवादन केले. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह गवगण शिक्षण संस्थेसह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऐन निवडणुकीच्या तोंडावर सक्रीय न होता आम्ही रोज जनतेच्या दरबारात

### डॉ.सारिकाताई क्षीरसागर; पिंपळवाडीत आरोग्य शिबिरात एक हजारांवर रूग्णांची तपासणी

**डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली रुग्णांची तपासणी**

पिंपळवाडीतील आरोग्य शिबिरास भेट देत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी रुग्णांसह नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी स्वतः काही रूग्णांची तपासणी केली. विधानसभा मतदारसंघातील पिंपळवाडीचे हे आठवे आरोग्य शिबिर असून अनेकांच्या शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात आल्या आहेत.



**बीड (प्रतिनिधी)** दि.4 : ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सक्रिय न होता, आम्ही दररोज चोवीस तास बीडकरांच्या सेवेत आहोत. निवडणुकीच्या तोंडावर दिशाभूल करणारे कार्यक्रम घेण्याऐवजी आरोग्य सेवा देणे माझ्यासह डॉ.योगेश यांना योग्य वाटले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर इतरांप्रमाणे सक्रीय न होता आम्ही रोज जनतेच्या दरबारात जातो, त्यामुळे बीडची जनता आम्हालाच आशिर्वाद देईल, असा विश्वास कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

बीड तालुक्यातील पिंपळवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने मोफत आरोग्य शिबिर शुक्रवारी (दि.4) पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या. व्यासपीठावर ह.भ.प.भक्तीदास महाराज शिंदे, ह.भ.प. तुकाराम महाराज भारती, माजी आमदार जनार्धन तुपे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, पिंपळवाडीच्या उपसरपंच पूजाताई



बहिरवाळ, बेलखंडीचे सरपंच गुंडीबा देवडे, राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, करचुंडीचे माजी सरपंच भालचंद्र भंडाणे, भाळवणीचे माजी सरपंच सचिन बहिरवाळ, शिवाजी येडे, मुळूकचे सरपंच रामकिसन कदम, वरवटीचे सरपंच बाळासाहेब इंगोले यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, रूग्णसेवा हा राजकारणाचा भाग कधीच असू शकत नाही. माझ्यासह डॉ.योगेश हे वैद्यकीय क्षेत्र आणि राजकारणात सक्रीय आहेत. आमची आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून सुरु असलेली आरोग्य सेवा राजकारणापलिकडे जाऊन सुरुच राहणार आहे. आम्ही निवडणुकीच्या तोंडावर दिशाभूल करण्याऐवजी शाश्वत विकास कार्यक्रमांवर भर देत राहू. हाच प्रयत्न आगामी काळातही राहील, असे त्या म्हणाल्या. यावेळी श्रीरंग खटाणे, सीताराम बहिरवाळ, रवि काळे, बाळासाहेब थोरात, वैभव तुपे, तुकाराम वाघुले, भास्कर कदम, सुंदर कांगरे, राम जाधव, विनोद बहिरवाळ, भारत डोंगर, बाबुराव वाघुले, अंकुश वाघुले, रामहरी वाळेकर, महेश वनवे, बापू येळवे, बाबा मस्के, बाळासाहेब जटाळ, महेश मातकर, शहादेव खोसे, अशोक वेदपाठक यांच्यासह रूग्ण, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## इंजिनीयर नितीन जगताप यांची पुन्हा एकदा परदेशात गगनभरारी



बीड (प्रतिनिधी)-अरुणाई ॲग्रोचे चेअरमन नितीन जगताप यांनी दुध उत्पादकांसाठी खुप महत्वाचे कार्य पालसिंगण या भागात व पंचक्रोशीत केले आहे. लॉकडाऊन मध्ये दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाचे योग्य मुल्य मिळत नव्हते तसेच त्यांना दुध फेकुन देयायची वेळ आली होती तेंव्हा अरुणाई ॲग्रोच्या मार्फत त्यांनी पंचक्रोशीत लॉकडाऊन मध्ये अरुणाई दुध डेअरी चालु करुन दुध उत्पादक शेतकऱ्यांना डेअरी सोबत, पशुखाद्य तसेच किराणा दुकानामार्फत भरपूर सहकार्य केले तसेच अरुणाई डेअरीच्या मार्फत दुध उत्पादकांना दुधाबद्दल वेळोवेळी मार्गदर्शन केले तसेच गावामध्ये पण ते धार्मिक व सामाजिक कार्यांत सतत अग्रेसर राहिले आहेत. अरुणाई ग्रो चालु करायच्या आगोदर पण ते परदेशात इंजिनीयर म्हणुन काम करत होते आणि अजुन एकदा परदेशात ओमान या देशात त्यांची नामांकीत कंपनीमध्ये इंजिनीयर पदी निवड झाल्याबद्दल सर्व मित्र-परिवारांकडुन त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



वॉटरशेड ऑर्गनायझेशन पाटोदा विभाग येथील ऑफिसला पत्रकार गोकुळ इंगोले यांनी भेट दिली असताना वॉटरशेड ऑर्गनायझेशन पाटोदा विभाग त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळीराजेंद्र जाधव फिल्ड ऑफिसर अनिल पालवे टेक्निकल ऑफिसर शेख इनुस जलसेवक (गटनेता) यावेळी येथील कर्मचारी उपस्थित होते

## बीड जिल्ह्यातील विधानसभेसाठी इच्छुक उमेदवारांच्या आज मुलाखती



बीड । प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील सहा मतदारसंघातुन विधानसभा निवडणूक २०२४ साठी इच्छुक म्हणून पक्षाकडे अर्ज केलेल्या उमेदवारांच्या शनिवार (दि.५) रोजी पुणे येथे मुलाखती होणार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातून इच्छुक असलेल्या अर्जदार उमेदवारांनी या मुलाखतींसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ. संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. विधानसभा निवडणूक २०२४ च्या उमेदवारीसाठी इच्छुक म्हणून पक्षाकडेअर्ज केलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम पक्षाकडून आयोजित करण्यात आला आहे. मराठवाड्यातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती शनिवार (दि.५) रोजी सकाळी १०:०० ते ६:०० या वेळेत पुणे येथील गुलटेकडी परिसरातील निसर्ग मंगल कार्यालय, मार्केट यार्ड याठिकाणी होणार आहेत.

## खापरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महात्मा गांधी यांची जयंती साजरी,

### त्रिमूर्ती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ, क्रियाशील केंद्र देवडी संस्थे मार्फत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,




वडवणी प्रतिनिधी अंकुश गवळी वडवणी तालुक्यातील प्राथमिक जिल्हा परिषद शाळा खापरवाडी या ठिकाणी, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली, यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक या ठिकाणी त्रिमूर्ती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ देवडी या संस्थेमार्फत, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले, या ठिकाणी शाळेचे मुख्याध्यापक सह शिक्षक संस्थेचे अध्यक्ष तसेच गावातील प्रतिष्ठत नागरिक गावकरी उपस्थित होते, यावेळी संस्थेचे अध्यक्ष ईश्वर पटाईत, गोविंद कुरे, दत्तात्रय सुरवसे, अशोक लंगडे, सिताराम लंगडे, ईश्वर पुजारी, सुरज पटाईत, सहशिक्षक बिडकर वैभव , श्रीमती हंबर्डे मॅडम, श्रीमती राऊत ज्योती मॅडम, आधी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते,

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ५ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चा गायरान व विविध मागण्यासाठी जिल्हा कचेरीवर धडकला आक्रोश मोर्चा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गायरान जमिनीसहीत विविध मागण्यासाठी आक्रोश मोर्चा पी आर पी चे मराठवाडा सरचिटणीस तथा जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यामध्ये बीड जिल्ह्यातील असंख्य गायरान धारक, विविध शासनाच्या योजने पासून वंचित राहिलेले लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील कसत असणाऱ्या शेतकऱ्यांना सातबारा तात्काळ देण्यात यावा. गायरान धारक शेतकऱ्यांच्या सातबारा वरील पोट खराब शब्द काढून त्यांना खरीप, रब्बी, पिक विमा भरण्याचा व राष्ट्रीयकृत बँकेकडून पिककर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा करून पंतप्रधान कृषी सन्मान निधीचा व इतर शासनाच्या सर्वयोजनेचा लाभ देण्यात यावा. महात्मा फुले महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ संत रोहिदास चर्मकार महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, अपंग महामंडळाला तात्काळ निधी देऊन प्रस्ताव दाखल केलेल्या लाभार्थीचे प्रस्ताव तात्काळ मंजुर करण्यात यावेत. शासकीय जागेवर घरे बांधून राहणाऱ्या शहरातील, ग्रामीण भागातील नागरीकांना पी.टी.आर. देऊन शासनाच्या इतर योजनेचा लाभ देण्यात यावा. भटके



विमुक्त आदिवासी समाजातील नागरीकांच्या विकासासाठी स्वतंत्र आराखडा तयार करावा. पारधी भिल्ल समाजातील बांधवाना शासनाने जात प्रमाणपत्रासाठी अडवणूक करण्यात येऊ नये व तात्काळ देण्यात यावे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगिरणी बोगस, बनावट असून विद्याथी, विद्याधीनी, नोकरीदार यांचं परस्पर जात वैधता प्रमाणपत्र घेऊन वस्त्रउद्योगाचे २७ कोटी, समाजकल्याणचे १४ कोटी ऊचलुन शासनास फसवले यांची उच्च पातळीवर चौकशी करण्यता येऊन मुख्यप्रवर्तक संगिता ठोंबरे व चेअरमन विजय प्रकाश ठोंबरे विरूध्द ४२० चा दाखल करून त्यांची सर्व मालमत्ता जप्त करण्यात यावी. केज पोलिस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगिरणी चौकशी प्रकरणी वरिष्ठांचे आदेश पायदळी तुडवत आहेत. त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.बीड नगर परिषदेने स्वच्छता टेंडर बंद करून शहरात सफाई काम करणाऱ्या शेकडो महिलांना कामावरून कमी केल्यामुळे शहरात घाणीचे साम्राज्य वाढले आहे. तरी तात्काळ कामावर घेण्यात यावे. संत भगवान बाबा समाज कल्याण अंतर्गत ऊसतोड मजुरांच्या मुलांचे, मुलीचे वस्तीगृहात निकृष्ट जेवण दिले जात असून सदरील प्रकरणाची तात्काळ चौकशी करावी व टेंडर रद्द करण्यात यावे यासाठी मोर्चा काढण्यात आला. मागण्या मान्य नाही झाल्या तर महाराष्ट्रभर आंदोलन करू असा इशारा पीप्लस रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे मराठवाडा सरचिटणीस तथा जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे यांनी अधिक तीव्र स्वरूपात आंदोलन करू आसा इशारा दिला आहे.

# आज बीडमध्ये अनिलदादा जगताप यांच्या संकल्पनेतली होम मिनिस्टर स्पर्धा होणार साकार!

## तहसीलच्या कार्यक्रमात मतदारांनी घेतली मतदानाची शपथ

### बीडमधील महिला-भगिनीं जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे- अनिलदादा जगताप

बीडमधील महिला-भगिनींच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता माझे सहकारी अमोल जाधव यांच्या माध्यमातून होममिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे दि. 5 ऑक्टोबर रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे सायं 6.00 वाजता भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे. फ्रिज, एलसीडी टीव्ही, शिलाई मशीन, पैठणी साडी तसेच संसार उपयोगी असणाऱ्या भेटवस्तू देखील सहभागी महिलां-भगिनींना देण्यात येणार आहे. अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील हे स्वतः उपस्थित राहणार असून पूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ते स्वतः करणार आहेत. रोजच्या दैनंदिन व्यापातून स्वतःसाठी थोडासा वेळ काढून बीड शहरातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे. ०००००



बीड प्रतिनिधी- बीडच्या संस्कृतीक, क्रीडा, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपले सर्वोपरी योगदान देणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या संकल्पना मार्गदर्शनाखाली बीड शहरातील महिला-भगिनींच्या अंगी असलेल्या कलागुणांना दर्जेदार व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने आज दि. 5 ऑक्टोबर 2024 रोजी सायं 6.00 वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे अमोल जाधव यांच्या वतीने भव्य दिव्य होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले असून विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक प्राप्त विजेत्या महिलेस फ्रिज, द्वितीय क्रमांक प्राप्त दोन महिलांना प्रत्येकी 1 एलसीडी टीव्ही असे दोन एलसीडी टीव्ही, तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या तीन महिलांना प्रत्येकी 1 शिलाई मशीन अशा तीन शिलाई मशीन व त्यानंतर पुढील 21 विजेत्या महिलांना प्रत्येक 1 पैठणी अशा 21 पैठणी साडी बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. याबरोबरच होम मिनिस्टर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला संसार उपयोगी आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन स्वतः महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीडमधील महिला-भगिनींनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे येऊन आपल्या नाव नोंदणी करावी अथवा योगेश सारूक : ९१३२७३७४७५, अक्षय जगताप : ९७३०३७२२२२, नवनाथ बोबडे : ७०३०५६२५९०, दत्ता ताटे : ९५९५४३४४०५, लक्ष्मीकांत दोडके : ९९२२८३९७५३ यांच्याशी संपर्क साधून ऑनलाईन नाव नोंदणी करावी.

## गोरक काळे यांना नेशन बिल्डर अवार्ड जाहीर - वाबळेवाडी शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

ता.13 (पुणे प्रतिनिधी) वाबळेवाडी शाळेतील शिक्षक गोरक काळे यांना रोटरी क्लब ऑफ शिक्रापूरचा नेशन बिल्डर अवार्ड नुकताच जाहीर झाला. शाल, श्रीफळ,पुष्पगुच्छ, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असल्याची माहिती रोटरी क्लब शिक्रापूरचे संस्थापक विरधवल करंजे, अध्यक्ष विठ्ठल वाघ, सचिव डॉ. तुषार पाचुंदकर यांनी नुकतीच दिली.

रोटरी क्लब ऑफ शिक्रापूर एक सामाजिक कार्यकरणारी संस्था आहे. समाजात उत्कृष्ट सामाजिक आणि शैक्षणिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रेरणा देण्याचे काम ही संस्था करत असते. दरवर्षी सप्टेंबरला शिक्षक दिनाचे औचित्य साधून ही संस्था शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना शिक्षणाधिकऱ्यांच्या हस्ते नेशन बिल्डर अवार्ड देऊन सन्मानित करते. यावर्षीही संस्थेच्या वतीने पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील 'जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाबळेवाडी येथील गोरक काळे यांना रोटरी क्लब ऑफ शिक्रापूरचा नेशन बिल्डर अवार्ड जाहीर झाल्याची माहिती रोटरी क्लब शिक्रापूरचे संस्थापक विरधवल करंजे, अध्यक्ष विठ्ठल वाघ, सचिव डॉ. तुषार पाचुंदकर यांनी नुकतीच दिली. त्याचे अधिकृत पत्र नुकतेच त्यांनी काळे यांना दिले आहे.

वाबळेवाडी शाळेत गोरक काळे गुरुजींना नेशन बिल्डर अवार्ड जाहीर झाल्याचे कळताच विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांनी शाळेतील मुख्याध्यापकांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. वाबळेवाडी शाळेतील अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची तालुक्यात ओळख आहे. त्यांना पुरस्कार जाहीर होताच शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

नेशन बिल्डर अवार्ड म्हणजे एक प्रकारे जबाबदारी. येथून पुढील काळात विद्यार्थी आणि शाळेसाठी अशाच प्रकारचे काम करून शाळेच्या गुणवत्ता विकास वाढीसाठी प्रयत्न करीन. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे ध्येय समोर ठेवून आपल्या सर्वांच्या सहकार्याने शाळा प्रगतीपथावर नेण्याचे काम करत राहील, असे मत यावेळी सत्कारमूर्ती काळे यांनी व्यक्त केले.

## आमदार राजेश पवार यांच्या वतीने पाटोदा थडी येथील भाविकांना काशी विश्वनाथ दर्शन



नायगाव ।हनुमंत चंदनकर ८९ नायगाव विधानसभा मतदारसंघातील आमदार राजेश पवार यांच्यावतीने आज दिनांक ४ ऑक्टोबर रोजी पाटोदा थडी येथील ४० भाविकांना काशी विश्वनाथाच्या दर्शनासाठी तीर्थयात्रा दर्शनासाठी भाविकांना रवाना केले आमदार पवार यांनी आपल्या मतदारसंघातील नागरिकांना तीर्थ दर्शन घडावे यासाठी अनेक तीर्थयात्रेचे आयोजन सुरू केले आहे जेजुरी येथील खंडोबाचे दर्शन यात्रा शिक्षक कपिलधार मन्मथ स्वामी दर्शन उज्जैन येथील महाकालेश्वर दर्शन अजमेर दर्शन यासह अनेक ठिकाणी तीर्थ दर्शनाला घेऊन जात आहेत पाटोदा येतील ग्रामदैवत हनुमंत रायाचे दर्शन घेऊन भाविक बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग काशी विश्वनाथाच्या दर्शनाला रवाना झाले यात महिला भक्त पुरुष भक्त हर हर महादेव जय श्रीराम च्या घोषणा देत काशी विश्वनाथ दर्शनासाठी रवाना झाले

# बीडमध्ये युथ टॉक विथ डॉ.योगेश उपक्रमातून तरूणाईशी थेट संवाद

## अभिनव उपक्रम राबवून करिअर, व्हिजनबद्दल नवमतदारांशी चर्चा

बीड (प्रतिनिधी) दि.४ : बीडमध्ये 'युथ टॉक विथ डॉ.योगेश' या अभिनव उपक्रमाअंतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी थेट तरूणाईशी संवाद साधला. हा कार्यक्रम शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयात शुक्रवारी (दि.4) पार पडला. यावेळी शेकडो युवा विद्यार्थी -विद्यार्थीनींची उपस्थिती होती. देशाच्या ताकदीमध्ये युवा शक्तीचा मोठा वाटा आहे. यावेळी तरुणाईचे विचार समजून घेतले. त्यांना करिअर संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर हे प्रमुख उपस्थितीत होते. तरुण वर्गातील नवमतदारांसमोरील समस्या, त्यांची मते आणि प्रश्न या



विषयावर 'युथ टॉक विथ डॉ.योगेश' हा उपक्रम राबविला. डॉक्टर दाम्पत्याने हजारो युवकांशी मुक्तपणे संवाद साधला. यावेळी अनेकांनी आपल्या मनातील प्रश्न विचारले. यामध्ये बीड मतदारसंघातील प्रत्येक ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी अभ्यास करण्यासाठी वाचनालय उभारण्यात यावे, पालीच्या तळ्यासह अनेक निसर्गरम्य परिसरात सुरक्षा आणि सुविधा मिळाव्यात, ज्याप्रकारे मुलींसाठी हॉस्टेल आहेत, त्याच प्रकारे मुलांसाठी देखील हॉस्टेल असावे. खेळाडूंसाठी विविध ठिकाणी सोयी सुविधा मिळाव्यात. मुलींना पोलीस भरतीचा सराव करताना सुरक्षा पाहिजे. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी येण्यासाठी बसची व्यवस्था करावी, जेणेकरून त्यांना ये जा करण्यासाठी त्रास होणार नाही. यासह अनेक प्रश्न तरूणाईने मांडले. त्यांच्या प्रश्नांचे निराकरण देखील डॉ.योगेश क्षीरसागर आणि डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी तितक्याच आपुलकीने, गांभीर्याने केले. आपल्या शिक्षण संस्थांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेला प्रथम प्राधान्य राहिले आहे. येणाऱ्या काळात उद्योग धंद्यासाठी देखील प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. युवा शक्तीने मतदान करताना आपल्या समस्या कोण सोडवू शकतो? आपल्या भागाचा विकास कोण करू शकतो? याकडे देखील गांभीर्याने विचार करून मतदान करण्याचा सल्ला दिला. डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी मुलींना तब्येतीची काळजी घेण्यासाठी नियमित जीम व योगा करण्याचा सल्ला दिला. यावेळी डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्याने अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात तरुण वर्गाशी संवाद साधला. त्यामुळे तरुण वर्गात उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले.

**इतर महाविद्यालयांत कार्यक्रम घेणार**

'युथ टॉक विथ डॉ.योगेश' या अभिनव उपक्रमाअंतर्गत डॉक्टर दाम्पत्याने तरूणाईशी थेट संवाद साधला. त्यांना सौ.के.एस.के. महाविद्यालयात मिळालेला प्रतिसाद पाहून बीडमधील इतर महाविद्यालयांत हा कार्यक्रम घेणार असल्याचा मानस डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

# दस्तऐवज नोंदणीसाठी ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क सक्तीचे करत गोरगरीबांच्या घरावर दरोडा घालणे बंद करावे:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०४ )राज्य सरकारने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा करून मुद्रांक शुल्क वाढीचा निर्णय घेतल्याने महसूल विभागाकडून आता दस्त नोंदणीसाठी १०० आणि २०० रूपयांचे मुद्रांक शुल्क बाद करून केवळ ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क आकारण्याचा सक्तीचा शासन निर्णय खरेदी , नोटरी, हक्क किंवा प्रतिज्ञापत्रासाठी गोरगरीबांना आर्थिक संकटात टाकणारा असुन लाडक्या बहिणीला १५०० रूपये महिना सारखी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेल्या सवंग योजनेमुळे शासनाची तिजोरी रिकामी झाली असुन ती भरण्यासाठी मुद्रांक शुल्क वाढीचा गोरगरीबांच्या घरांवर दरोडा घालणारा निर्णय रद्दबातल करण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०४ शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी धरणे आंदोलन करून जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, पालकमंत्री धनंजय मुंडे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,रामधन जमाले, अशोक येडे,शेख युनुस,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन बप्पासाहेब पवार,आदी सहभागी होते.

सविस्तर माहितीस्तव
- - -

राज्याचे मुद्रांक धोरण बदलुन आता कोणत्याही नोंदणीसाठी ५०० रूपयांचा मुद्रांक सक्तीचा करण्यात आला आहे. आतापर्यंत सरकारी दस्तावेज असो किंवा साधी नोटरी करायची असो तसेच बँकेतुन कर्ज घ्यायचे असो सर्वसाधारणपणे नागरीकांना किमान १०० रुपयांच्या मुद्रांकावर नागरीकाचा दस्तावेज ग्राह्य धरला जात होता.मात्र यापुढे १०० आणि २०० रुपयांचे मुद्रांक पेपर ईतिहास जमा होणार आहेत कारण आता किमान ५०० रुपयांचा मुद्रांक खरेदी, नोटरी, हक्क किंवा प्रतिज्ञापत्रासाठी सक्तीचा करण्यात आला आहे. राज्य सरकारने मुद्रांक शुल्क वाढीचा निर्णय घेतल्यामुळे महसूल विभागाकडून आता केवळ ५०० रुपयांचा मुद्रांक शुल्क जारी करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड बसणार आहे त्यामुळे हा निर्णय तातडीने रद्द बातल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ५ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



## धनंजय मुंडेंच्या पाठपुराव्यास मोठे यश; ऊसतोड कामगारांसाठी संत भगवानबाबा ऊसतोड कामगार अपघात विमाफयोजना लागू

### मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय, ऊसतोड कामगार, वाहतूकदार, मुकादम तसेच बैलजोडी व झोपडीला सुद्धा मिळणार विम्याचे कवच

### स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या एका स्वप्नपूर्तीत माझा वाटा आहे, याचा आनंद वाटतो – धनंजय मुंडे

# मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे मुंडेंनी मानले



मुंबई (दि. 04) - राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करून त्याअंतर्गत ऊसतोड कामगार व वाहतूकदार, मुकादम आदींसाठी संत भगवानबाबा ऊसतोड कामगार विमा योजना प्रस्तावित केली होती, त्या योजनेस आज संपन्न झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सुमारे 10 लाख ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार, मुकादम तसेच सुमारे दीड ते दोन लाख बैलजोड्या त्याचबरोबर कामगारांच्या झोपड्या यांना सुद्धा विम्याचे कवच आज झालेल्या निर्णयानुसार लागू करण्यात येत असून या योजनेचा संपूर्ण खर्च स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या भांडवलातून खर्च करण्यात येईल. ऊसतोड कामगार, मुकादम, कारखाना यांपैकी कुणावरही या योजनेचा कसलाही आर्थिक भार राहणार नाही.

राज्याच्या बीडसह अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड, जालना, धुळे, जळगाव आदी जिल्ह्यातील सुमारे 10 लाख ऊसतोड कामगार वेगवेगळ्या जिल्ह्यात तसेच शेजारील राज्यात कमीत कमी 6 महिने स्थलांतर करून उसतोडणीला जातात. ऊन, वारा, पाऊस, थंडी अशा कोणत्याही परिस्थितीत दिवसरात्र अत्यंत मेहनत व जोखमीचे काम त्यांना करावे लागते. ऊसतोडणी व वाहतुकीदरम्यान अनेक अपघात, विजेचा शॉक, सर्पदंश, वाऱ्या-पावसाने नुकसान, रस्ते अपघात यांसारख्या शेकडो समस्यांना तोंड देताना ऊसतोड कामगारांचे अनेकदा जीव जातात, अनेकजण कायमस्वरूपी अपंग होतात व त्यांच्या कुटुंबाचा आधार नाहीसा होतो. त्यामुळे या ऊसतोड कामगारांना, वाहतूक कामगारांना तसेच त्यांच्या पशूंना स्वतंत्र अपघात विमा योजना असावी, त्याद्वारे मृत्यू झाल्यास आर्थिक मदत, अपंगत्व आल्यास आर्थिक मदत व उपचार अशा निरनिराळ्या तरतुदी असाव्यात असे 2022 मध्ये धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय विभागामार्फत प्रस्तावित केले होते.

राज्याचे मुख्यमंत्री व सध्याचे सामाजिक न्याय मंत्री एकनाथराव शिंदे यांनी अर्थ व नियोजन विभागाच्या समन्वयातून या योजनेला मूर्त स्वरूप दिले असून, त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. ऊसतोड कामगारांना विम्याचे कवच असावे, हे स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांचे स्वप्न आज महायुती सरकारच्या माध्यमातून पूर्ण होत आहे आणि त्यात माझाही काही वाटा आहे, याचा मनाला मनापासून आनंद वाटतो आहे, याबाबद्दल मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मनापासून आभार मानतो, असे भावनिक उद्गार धनंजय मुंडे यांनी यावर प्रतिक्रिया देताना व्यक्त केले आहेत.

पूर्वी केवळ कागदावर राहिलेले ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडून सामाजिक न्याय खात्याकडे हस्तांतरित करून घेत धनंजय मुंडे यांनी या महामंडळाला मूर्त स्वरूप दिले. महामंडळाचे कार्यकारी संचालक मंडळ, लेखाशीर्ष निर्माण करून ऊसतोड कामगारांची प्रथमच शासकीय कागदावर 'ऊसतोड कामगार' म्हणून नोंदणी केली. या महामंडळाचा खर्च शासनावर अधिभार होऊ नये म्हणून राज्यात गाळल्या जाणाऱ्या उसावर प्रतिटन 10 रुपये कल्याण निधी साखर कारखाना व त्याच्या समप्रमाणात निधी शासनाकडून अशी कायमस्वरूपी व्यवस्था केली. याच महामंडळाच्या माध्यमातून राज्यात संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करून ऊसतोड कामगारांच्या मूला मुलींसाठी 82 वसतिगृहे सुरु करून ऊसतोड कामगारांच्या हातात वडिलोपार्जित कोयता न देता पाटी-पुस्तक देऊन शिक्षणाचा मार्ग खुला केला आहे. त्यापाठोपाठ आता ऊसतोड कामगारांच्या विम्याचा प्रश्न निकाली निघाल्याने काही प्रमाणात का असेना परंतु कायम विकासापासून वंचित राहिलेल्या या वर्गाला खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे, असे म्हणता येईल.



महाराष्ट्र सरकार च्या लोककल्याणकारी कामांचा आढावा घेणाऱ्या लोकराज्य च्या विशेषांकाचे प्रकाशन आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकिपूर्वी मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले

## केज नवरात्र महोत्सवात रोटरीचे सांस्कृतिक कार्यक्रम

केज । शेख सज्जाद प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी नवरात्र महोत्सवात रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने "होम मिनिस्टर" आणि डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात जास्तीत जास्त महिला व कलाकारांनी सहभागी व्हावे असे आवाहन केज रोटरीच्या वतींने अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद व संस्थापक अध्यक्ष हनुनंत भोसले यांनी केले आहे. येत्या मंगळवार दि 8 ऑक्टोबर रोजी सायंकाळी ठीक 4 वाजता "होम मिनिस्टर" कार्यक्रम पार पडणार असून यासाठी 7 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत नावनोंदणी करता येईल. मुलामुलींसाठी "डान्स स्पर्धा" गुरुवार दि 10 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 5 वाजता सुरू होणार आहे. डान्स स्पर्धेसाठी बुधवार दि 9 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत नावनोंदणी करता येणार आहे. नांव नोंदणीसाठी अध्यक्ष प्रकाश कामाजी- 9860652454, हनुमंत भोसले-9423733888, 7972058885,विकास मिरगणे-9422470710 प्रवीण देशपांडे-9822251555 महेश जाजू- 9422741027 दादा जमाले-9561518333 अरुण अंजाण-+919325023790 बापूराव सिंगण-9422236139 प्रा.डॉ बीजे हिरवे-9881858578 यांच्याशी संपर्क साधावा. वरील कार्यक्रम भवानी माता मंदिर परिसरात पार पडतील.तरी केज शहरातील कलाप्रेमी नागरिक व महिलांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केज रोटरीच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण पथकाची शहरात कारवाई

जालना ।असलम कुरेशी

शहरातील विविध ठिकाणी अवैधरित्या गुटखा, तंबाखु, मावा, जर्दा, खर्रा आणि सुट्टे सिगारेट इत्यादींची विक्री करणाऱ्या तसेच तंबाखु नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व पान टपरीधारकांवर कोटपा-२००३ कायद्यातंर्गत जिल्हा तंबाखु नियंत्रण अंमलबजावणी पथकाद्वारे छापे टाकण्यात आले. कोटपा कायद्याअंतर्गत एकुण १७ पानटपरीवर कारवाई करुन ४ हजार ६०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी दिली आहे. जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, अतिजिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही



कार्यवाही करण्यात आली. पानटपरी धारकांनी अवैधरित्या कुठल्याही तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाची विक्री करु नये, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

आरोपीस अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता आरोपींनी नांदेड शहरात उस्मान नगर रोड, मालेगाव रोड, पुर्णा रोड, मालेगाव रोड पेट्रोल पंपाजवळ व आसेगाव वसमत रोड अशा एकुण ०६ ठिकाणी सुध्दा जबरी चोरी केल्याचे सांगीतले. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार नितिन गोरे, आकाश टापरे, आजम प्यारेवाले, नरेंद्र साळवे, हरिभाऊ गुंजकर, साईनाथ कंठे, दत्ता नागरे, इरफान पठाण, स्था.गु.शा. यांनी केली आहे.

## मूग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरु

नांदेडप्रतिनिधी:बालाजीसिरसाट

नांदेड :-केंद्र शासनाचे किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत एन.सी.सी.एफ च्यावतीने जिल्ह्यात खरीप हंगाम 2024-25 मध्ये हमीभावाने मूग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी 1 ऑक्टोबर पासून ऑनलाईन पोर्टलवर नोंदणीसाठी 13 खरेदी केंद्र निश्चित केली आहेत. शेतकरी बांधवांनी ऑनलाईन नोंदणीसाठी चालू हंगामातील मूग, उडीद, सोयाबीन या पिकांचा ऑनलाईन पिकपेरा नोंद असलेला 7/12 उतारा, आधारकार्ड व बँकपासबूक इत्यादी कागदपत्रे संबंधित तालुक्यातील खरेदी केंद्रावर देऊन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी राजेश हेमके यांनी केले आहे. प्रत्यक्षात मुंग, उडीद खरेदी 10 ऑक्टोबर व सोयाबीन खरेदी 15 ऑक्टोबर पासून सुरू होणार आहे. या खरेदी केंद्रात मुखेड तालुक खरेदी विक्री संघ मुखेड, हदगाव तालुका खरेदी विक्री संघ हदगाव, लोहा तालुका खरेदी विक्री संघ लोहा, कृषि उत्पान्न बाजार समिति किनवट, तालुका खरेदी विक्री संघ बिलोली (कासराळी), पंडित दीनदयाल उपाध्याय अभिनव सह. संस्था देगलूर, मृष्णेश्वर फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. धनज (ता. मुखेड), सिद्राम फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. बेटमोगरा (ता. मुखेड), किनवट तालुका कृषिमाल प्रक्रिया सह. संस्था गणेशपूर (ता. किनवट), तिरुपति शहापूर फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. वन्नाळी (ता. देगलूर), राधामाई फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. रातोळी (ता.नायगाव), अष्टविनायक शेतीमाल खरेदी विक्री सह. संस्था मानवाडी फाटा (ता. हदगाव), व श्रीजगदंब फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. जांब (बु) (ता. मुखेड) या ठिकाणी मार्केटिंग फेडरेशनमार्फत मूग, उडीद, सोयाबीन ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरू झाली आहे.

## सौर कृषी पंप योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

जालना/असलम कुरेशी

राज्य शासनाकडून ज्या शेतकऱ्यांकडे विद्युत जोडणी नाही अशांना दिवसा सिंचन करण्यासाठी महाकृषी ऊर्जा अभियान पीएम कुसुम ही योजना सुरु करण्यात आली आहे. शेतकरी या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करु शकतात. छत्रपती संभाजीनगर येथील महाऊर्जा विभागीय कार्यालयाअंतर्गत दि.२७ सप्टेंबर, २०२४ रोजीपर्यंत २४ हजार २६० सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले असून १७ हजार ९४५ सौर



कृषी पंपाचे काम प्रगतीपथावर आहे. ५ हजार २१६ शेतकऱ्यांनी लाभार्थी हिस्सा भरणा केलेला नाही. तरी शेतकऱ्यांनी लाभार्थी हिस्सा भरुन सौर कृषी पंप योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय महाव्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## समांतर कॉंग्रेस पार्टीच्या प्रदेश अध्यक्षपदी अशोक सोनवणे यांची निवड



बीड । प्रतिनिधी चौसाळा येथिल सामाजिक कार्यकर्ते अशोक सोनवणे यांची संमातर कॉंग्रेस पार्टीच्या प्रदेशअध्यक्षपदी निवड करण्यात आली असुन पार्टीचे महासचिव तानाजी दुनघव यांनी तसे नियुक्तीपत्र दिले आहे. अशोक सोनवणे यांनी यापूर्वी विविध सामाजिक संघटनेमध्ये विविध पदावर कार्य केले आहे त्यांनी सामाजिक व राजकिय चळवळीमध्ये सक्रीय काम केले असुन महात्मा फुले,राजर्षी शाहु महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,कॉम्रेड आण्णाभाऊ साठे या महापुरूषांच्या विचारांचा प्रचार प्रसार करून दलित मागासवर्गीय ,शेतकरी,भूमीहीन,समाजापर्यंत महामानवाचे विचार घेऊन समाजाला जागृत करण्याचे कार्य केले आहे. त्यांनी शासनाच्या बीड जिल्हा रोजगार हमी योजना कमिटी, सार्वजनिक वितरण दक्षता समिती या पदावर काम केले असुन त्यांना महाराष्ट्र शासनाचा साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे समाजभुषण पुरस्कार मिळालेला आहे. यापुढे आपण संमातर कॉंग्रेस पार्टी या पक्षाचे ध्येय धोरण व विचार घेऊन पक्षाचे काम वाढवणार आहोत लवकरच मराठवाडयातील सर्व जिल्हा प्रमुखाच्या नविन नियुक्ती करून पक्षाचे काम वाढवणार असल्याचे मत सोनवणे यांनी व्यक्त केले. या निवडी प्रसंगी पक्षाचे महासचिव तानाजीराव दुनघव, फुलचंद सिरसट,नसीर पठाण,दत्तात्रय घुले,विजयकुमार गायकवाड,आप्पासाहेब कदम,बाबुराव नागरगोजे,भिमराव लक्तरे,संभाजी दुनघव,विनोद मुजमुले,संतोष वाघमारे आदी मान्यवर उपस्थीत होते.

## नवी मुंबई सिडको प्रकल्पग्रस्त महासंघाच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात नगरविकास विभाग अधिकाऱ्यांची भेट

### विविध समस्या, मागण्या संदर्भात झाली सकारात्मक चर्चा

उरण ।विठ्ठल ममताबादे

नवी मुंबई सिडको प्रकल्पग्रस्त महासंघाने गरजेपोटी घरांबाबत मा. मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाबाबत सहसचिव श्री सुबा राव शिंदे ( ज्यांनी जीआर वर सही केली आहे ते )नगरविकास विभाग,महाराष्ट्र शासन यांचे सोबत बैठक झाली.नवी मुंबई शहरी क्षेत्रातील तसेच ९५ गावातील विस्तारित गावठाणातील मिळकतींना मालकी हक्क ( फ्री होल्ड ) देण्या बाबत सरकारचा



निर्णय झाला आहे .अंतिम शासन निर्णय( GR) लवकरच येत्या काही दिवसात जारी करण्यात येईल असे सुब्बा राव शिंदे यांनी नवी मुंबई सिडको प्रकल्पग्रस्त महासंघाच्या शिष्टमंडळाला सांगितले .११ मार्च २०२४ आझाद मैदान येथील विराट मोर्च्या तील मालकी हक्का बाबतची प्रमुख मागणी अंतिम निर्णया पर्यंत पोहचल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये आनंद आणि उल्हासाचे वातावरण निर्माण झाले आहे.तसेच महासंघाच्या इतर दोन मागण्या १२.५० टक्के भूखंडातून वजा केलेले बांधकाम क्षेत्र कुठलीही वजावट न करता पूर्ण टी डी आर स्वरूपात देण्याचे मान्य झाले आहे व घरा बाजूचे अंगण आणि परिसर मालकी हक्काने (फ्री होल्ड ) मिळणार आहे .तसेच प्रकल्पग्रस्तांची गावठाणा बाहेरील घरा सह अस्तित्वात असलेली घरे क्लस्टर योजनेत सामाविस्ट केली जाणार नाहीत. या मागण्या मान्य झाल्या आहेत. गुरूवार दि.३/१०/२०२४ रोजी मंत्रालयातील अधिकाऱ्यांची नवी मुंबई सिडको प्रकल्पग्रस्त महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली.यावेळी अध्यक्ष भूषण पाटील ,कार्याध्यक्ष दिपक पाटील ,सरचिटणीस सुधाकर पाटील ,खजिनदार अरविंद घरत ,प्रा राजेंद्र मढवी ,रघुनाथ पाटील ,प्रताप पाटील, प्रकाश पाटील ,राज पाटील,नितेश वैती इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते .

## कलावंतांच्या न्याय व हक्कासाठी केज तहसीलवर कलावंतांचा जागर लाडके कलावंत योजना सुरू करा-अनिल वैरागे

**केज । सचिन भालेराव**

कलावंतांच्या विविध मागण्यासाठी आज दिनांक ४ ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयापर्यंत शेकडो कलावंतांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ संलग्न कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने वाजत गाजत जागर करत निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये कलावंतांच्या विविध मागण्या जसे की लाडके कलावंत योजना सुरू करणे बस प्रवास मोफत करणे तसेच कलावंतांना स्वतंत्र घरकुल योजना लागू करणे कलावंतांना विमा सुरक्षा लागू करणे आणि कलावंतांना मानधन सुरु करण्यापूर्वी त्या कलाकाराचे वय व



कलाकाराची परीक्षा घेऊनच मानधन सुरू करण्यात यावे अशा विविध मागण्यांचा उल्लेख होता महाराष्ट्र ही कलावंतांची आणि संतांची भूमी आहे आपल्या लोककलेच्या माध्यमातून मनोरंजनाबरोबरच कलेचा वारसा पुढे चालवणारे तमाम महाराष्ट्रातील कलावंत हे सरकारी योजनेपासून वंचित आहेत म्हणून पुरोगामी पत्रकार संघ जिल्हा प्रमुख दत्तात्रय यांच्या मार्गदर्शनाखाली कला क्रीडा विश्व समिती चे तालुका अध्यक्ष अनिल वैरागे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कलावंतांच्या उपस्थितीमध्ये तहसीलदा यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना केज तालुका कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी पुरोगामी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा राज्य प्रसिद्धी प्रमुख दत्तात्रय मुजमुले कला क्रीडा विश्व समितीचे तालुकाध्यक्ष अनिल वैरागे पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष रणजीत घाडगे, सचिन लांडगे ज्येष्ठ कलावंत शाहीर तुकाराम ठोंबरे व मुनीर कुरेशी शेख इक्बाल किशोर भांडे सिंधुताई मुळे अनिता ताई कसबे यांच्यासह इतर पदाधिकारी व शेकडो कलावंत उपस्थित होते.

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री यांनी मानले केंद्र सरकारचे आभार

नवी दिल्ली, दि. 3 : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षते खालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार तसेच मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत. मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची ऐतिहासिक घटना घडली आहे. हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा दिवस आहे. राज्य शासनाने यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. हा क्षण प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या भाषेची समृद्धी आणि वारसा जपण्यास हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मराठी भाषा मंत्री यांनी व्यक्त केली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी अनेक मराठी भाषक, विचारवंत, भाषेचे अभ्यासक, साहित्यिक आणि समीक्षकांचे साह्य झाले. त्यांच्यासह मोलाचे सहकार्य करणाऱ्या तसेच मराठी भाषिक व मराठीवर प्रेम करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करून त्यांनी सर्वांना धन्यवाद दिले आहेत.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची घोषणा केली असून, मराठीसह पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

शनिवार ५ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4



# राज्य सरकारचा निर्णयांचा धडाका!

## मंत्रिमंडळ बैठकीत घेतले तब्बल ३४ निर्णय




**मुंबई / प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी महायुती सरकारना एकामागून एक निर्णयांचा धडाका लावला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक आज पार पडली. मंत्रिमंडळाने आजच्या बैठकीत तब्बल ३४ निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ-एमएसआरडीसी मार्फत पुणे शहराभोवती बांधण्यात येणाऱ्या रिंग रोडच्या कामास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णय संक्षिप्त स्वरुपात 1) राज्यातील अकृषिक कर पूर्णपणे माफ (महसूल विभाग) 2) न्यायाधीकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांसाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागवणार (महसूल विभाग) 3) दौंड येथे बहुउद्देशीय सभागृह नाट्यगृहासाठी शासकीय जमीन (महसूल विभाग) 4)त्र्यंबकेश्वर तालुक्यातील किकवी प्रकल्पाच्या कामास मान्यता (जलसंपदा विभाग) 5) टेंभूर्णी उपसा सिंचन योजनेस स्व. अनिल भाऊ बाबर यांचे नाव (जलसंपदा विभाग) 6) पूर्णा नदीवर दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना गती देणार सिल्लोड मधील जमिनीला सिंचन (जलसंपदा विभाग) 7) प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास आता दोन वर्षाचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद (पर्यटन) 8) राज्यातील खेळाडूंसाठी पारितोषिक रक्कम वाढवली (क्रीडा विभाग) 9) राज्यातील आणखी 104 आयटीआय संस्थांचे नामकरण (कौशल्य विकास) 10) संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना राबवणार (सामाजिक न्याय विभाग)11. लहान जलविद्युत प्रकल्पासाठी बांधा वापरा हस्तांतरण धोरण (जलसंपदा विभाग) 12 ) कोकण पुणे विभागासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन कंपन्या (मदत व पुनर्वसन विभाग) 13) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (वैद्यकीय शिक्षण) 14) राज्यात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र स्थापन करणे (वैद्यकीय शिक्षण) 15) जैन समाजासाठी अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ (अल्पसंख्याक विकास विभाग) 16) महाराष्ट्र भूजलाशयीन मच्छीमार कल्याणकारी महामंडळ (पदुम विभाग) 17) आजरा तालुक्यातील वेळवट्टी, गवसे, घाटकरवाडी बंदिस्त पाईपलाईन टाकणार (मृद व जलसंधारण) 18 ) बंजारा, लमाण तांड्यात ग्रामपंचायतसाठी लोकसंख्येची अट शिथिल (ग्रामविकास विभाग)19) कागल येथील सागावमध्ये नवीन शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय (वैद्यकीय शिक्षण विभाग) 20) महाराष्ट्र सागरी मच्छीमार कल्याणकारी महामंडळ स्थापन करणार (मत्स्य व्यवसाय विभाग) 21) कुडाळ तालुक्यातील डोंगरेवाडीत साठवण तलाव (मृद व जलसंधारण विभाग) 22 ) बारी, तेली, हिंदू खाटीक, लोणारी समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे (इतर मागासवर्ग विभाग)22. बारी, तेली, हिंदू खाटीक, लोणारी समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे (इतर मागासवर्ग विभाग) 23) गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना कायमस्वरूपी राबवणार 2604 कोटीस मान्यता (मृद व जलसंधारण विभाग) 24) राज्यात हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क स्थापन करणार 1 लाख 60 हजार कोटींचे गुंतवणूक अपेक्षित (उद्योग) 25) उच्च तंत्रज्ञानावरील अतिविशाल प्रकल्प योजनेत सुधारणा अधिकाधिक प्रकल्पांना प्रोत्साहन (उद्योग विभाग) 26) राळेगण सिद्धी येथील उपसा सिंचन योजनेचे सक्षमीकरण (मृद व जलसंधारण विभाग) 27) शिरोळ तालुक्यातील गावांमध्ये भूमिगत चर योजना राबवणार (जलसंपदा विभाग) 28) बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक संस्थांना दहा लाखांपर्यंत अनुदान योजना (अल्पसंख्याक विकास विभाग) 29) सोलापूर ते मुंबई हवाई मार्गासाठी व्हायबिलिटी गॅप फंडिंग देणार (विमानचालन विभाग) 30) वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे व्यवसायरोध भत्ता देणार (सार्वजनिक आरोग्य विभाग)31. डेक्कन कॉलेज, गोखले संस्था, टिळक महाराष्ट्र मधील कर्मचाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजना 32. (उच्च व तंत्र शिक्षण) 33) वडाळा सॉल्ट पॅनमधील भूखंड शैक्षणिक कारणांसाठी (महसूल)34) रमाई आवास, शबरी आवास योजनेतील घरकूल अनुदानात वाढ. (सामाजिक न्याय)

माझा जो अनुभव आहे. त्यानुसार आम्ही शक्ती अभियान सुरू करत आहोत. या अभियानांतर्गत महिलांची सुरक्षा केली जाणार आहे. बालकाचं संरक्षण केलं जाणार आहे. तसेच युवकांमध्ये जागृती करायची आहे", असं अजित पवार यांनी सांगितलं.



दि.४ शुक्रवार रोजी आष्टी मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी दै.लोकमत ता प्रतिनिधी अजय जोशी यांची मराठी पत्रकार परिषद तालुकाध्यक्षपदी व जावेद शेख यांची उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बद्दल सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिपक घुमरे,प.स.माजी गोवर्धन सानप पदाधिकाऱ्यांच्या उपस्थिती होती...

## सह्याद्री मराठी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी विनोद शिंदे यांची निवड तर सचिवपदी सय्यद अर्शद यांची निवड

बीड । प्रतिनिधी बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे महाराष्ट्र राज्य पातळीवर पत्रकारांचे वैचारिक, सामाजिक तसेच न्याय मागण्यासाठी कार्यरत असणाऱ्या सह्याद्री मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य हा संघ कार्यरत असुन सदरील संघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी बीड आरोळी वार्ताचे संपादक विनोद शिंदे यांची तर सचिवपदी पत्रकार सय्यद अर्शद यांची संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ जावेद शेख यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली येणाऱ्या काळात महाराष्ट्रातील पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी सह्याद्री मराठी पत्रकार संघ स्थापन करण्यात आला आहे . बीड जिल्ह्यतील पत्रकारासाठी बांधवाच्या हितासाठी कार्यरत असणाऱ्या सहयाद्री मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकार सक्षमीकरण साठी प्रयत्न केले जाणार आहेत. पत्रकार कुटुंबियांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देऊन जास्तीत जास्त पत्रकार सभासद संघटनेला जोडले जाणार आहेत. पत्रकार विनोद शिंदे व सय्यद अर्शद यांचा अनुभव खूप मोठा आहे त्यामूळे यांना सहयाद्री मराठी पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी विनोद शिंदे व सचिव पदी सय्यद अर्शद यांची निवड करण्यात आली आहे. या वेळी संघाचे अध्यक्ष गोविंद नाना शिनगारे व कार्याध्यक्ष शहाजी भोसले यांनी व सर्व पदाधिकारी यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## देऊळगाव गुजरी परिसरात दोन पिलांसह बिबट्याची दहशत भितीचे वातावरण, मजूर कामाला येईना, शेतकरी हैराण!

### वनविभागाने तात्काळ लक्ष देण्याची गरज



जळगाव ।संजय जटाळ जामनेर तालुक्यातील देऊळगाव गुजरी व तोरणाळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याने चांगलाच धुमाकूळ घातलेला आहे काही ठिकाणी बिबट्या शेतकऱ्यांना एकटा आढळतो तर काही ठिकाणी बिबट्यासोबत दोन पिल्लेही असतात असे दृश्य अनेक शेतकऱ्यांच्या नजरेत आले या अगोदर काही शेतकऱ्यांच्या पशुधनावर बिबट्याने हल्लाही केला आहे मात्र बिबट्या दिवसाढवळ्या दिसत नव्हता परंतु गेल्या दोन दिवसात बिबट्या आपल्या दोन बछड्यांसह आपल्या शिकारीच्या शोधात फिरत असताना अनेक शेतकऱ्यांना आढळून आला आहे त्यामुळे शेती कामासाठी जाणाऱ्या मजूर वर्गामध्ये भीतीचे वातावरण तयार झालेले असून शेतकऱ्यांचे सोयाबीन व मका काढण्याची वेळ आहे त्यातच कापूसही सुरू झालाय परंतु बिबट्याचा हा प्रकार वाढत असल्याने सर्वत्रिक भितीचे वातावरण तयार झाले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना शेती कामासाठी मजूरही मिळेणा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे आपल्या जिवापेक्षा पैसा महत्त्वाचा नाही असेही मजूर वर्गाकडून बोलले जात आहे यासाठी वन विभागाने तात्काळ लक्ष घालून बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील शेतकरी बांधव व ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## आज अंबाजोगाई हमाल मापाडी युनियन च्या वतीने निवेदन देन्यात आले कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई



प्रतिनिधी।अंबाजोगाई महाराष्ट्र कामगार संघटना मान्यता प्रतिबंध मान्यता अधिनियम १९७१ची अंमलबजावणी करणेस्तव आपल्या मार्केट यार्ड अंतर्गत येणारे विविध खरेदी संघावर महाराष्ट्र राज्यातील हमालांच्या हाताला काम मिळवून देण्यास खरेदी विक्री संघालाआदेशित करणे बाबत सभापती व सचिव साहेब आपल्या सेवेत अंबाजोगाई हमाल मापाडी युनियन च्या वतीने नम्र निवेदन करण्यात येते की आपल्या मार्केट यार्ड अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारचे खरेदी विक्री संघ येथे पर राज्यातील हमाल यांना हमालीचे काम देऊन महाराष्ट्र राज्यातील स्थानिक हमाल यांना डावल्यामुळे स्थानिक च्या हमाल कामगारांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे त्या अनुषंगाने आपणास विनंती की सदरील खरेदी विक्री संघाला आपल्या कार्यालयाचे पत्र देऊन स्थानिक च्या हमाला शिवाय कामे देण्यास बंधन करावे पर राज्यातील मजुरांना कामावर घेऊ नये असे आदेशित करावे २२ जुलै २०२२ प्रतिबंध अधिनियम १९७१ च्या कायद्याचे आनूपालन होणार नाही याची खबरदारी घेऊन आपल्या मार्केट यार्ड मधील नोंदणीकृत हमालांच्या हाताला काम मिळवून द्यावीत ही आपल्या सेवेत नम्र विनंती करण्यात येते असे निवेदन द्वारा करण्यात आले बालासाहेब आदमाने अंबाजोगाई हमाल मापाडी युनियन अध्यक्ष

## क्युअर इंडिया आणि स्वाराती चा उपक्रम; फूट क्लिनिक च्या माध्यमातून ३० बालकांची दिव्यांगापासून मुक्ती



**दैनिक लोकआरंभ//**

प्रतिनिधी परवेज पटेल अंबाजोगाई - राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या क्युअर इंडिया आणि स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणा-या फूट क्लिनीक या उपक्रमाच्या माध्यमातून ३० बालकांची दिव्यांगापासून मुक्ती करण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण भागातील सामान्य रुग्णांना याचा फायदा होत आहे जन्मतःच वाकडी पाय असलेल्या बालकांवर सात दिवसाच्या आत उपचार केल्यास त्यांचे पाय बरे होतात. याची माहिती नागरिकांना मिळावी यासाठी राष्ट्रीय पातळीवर काम करणारी दिल्ली येथील क्यूर इंडिया संस्था बीड जिल्ह्यात काम करत आहे. त्याच्या समन्वयक अश्विनी पांचाळ आहेत आशा वर्कर यांच्या माध्यमातून समन्वयक अश्विनी पांचाळ आहेत. आशा वर्कर यांच्या माध्यमातून पांचाळ जिल्ह्यातील दिव्यांग मुलं शोधून अंगणवाडीच्या माध्यमातून त्या मुलांना रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्याचे काम करतात अश्या दिव्यांग बालकांवर खाजगी रुग्णालयात उपचार करण्यासाठी १० हजार ते १ लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च येतो मात्र 'फूट क्लिनिक" च्या माध्यमातून सर्व उपचार मोफत दिले जातात. आजपर्यंत भारतात दिव्यांग असलेल्या १ लाख मुलांवर मोफत उपचार करून ते पूर्णतः बरे झाले आहेत. त्याचं अपंगत्व नष्ट झाले आहे. या बालकांना लागणारे शूज हे क्यूर इंडिया मोफत देते. तसेच डॉक्टरांना प्रशिक्षण देखील दिले जाते अशी माहिती क्यूर इंडियाच्या बीड जिल्हा समन्वयक अश्विनी पांचाळ यांनी दिली आहे अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात मार्च २०२३ ला 'फूट क्लिनिक सुरू करण्यात आले. या ठिकाणी आठवड्यात दोन वेळा दिव्यांग असलेल्या बालकांवर उपचार करून त्यांना मार्गदर्शन करण्यात येते. मागील १ वर्षात ज्या बालकांचे पाय पूर्णपणे वाकडी होती ज्यांना भविष्यात चालणं शक्य नव्हते अश्या ५१ बालकांवर उपचार सुरू असून यातील ३० बालके पुर्णतः १००% बरी झाली. आज ते आपल्या पायावरती चालत आहेत माझ्या लेकरावर उपचार करण्यासाठी पैसे नव्हते मात्र आशा वर्करच्या माध्यमातून मला माहिती मिळाली त्यानंतर मी क्यूर इंडिया च्या पांचाळ मॅडम यांना भेटले. त्यांनी मला मार्गदर्शन केले आणि मी माझ्या लेकरावर स्वाराती रुग्णालयात असलेल्या 'फूट क्लिनिक' मध्ये उपचार केले या ठिकाणी पुर्णतः मोफत उपचार झाले, आज माझं लेकरु चालत आहे. असं कुंबेफळ येथील लाभार्थी यांनी सांगितले आहे ज्या लहान मुलांना अपंगत्व येते अश्या मुलांवर फूट क्लिनिक मध्ये उपचार केले जातात यासाठी क्यूर इंडिया संस्था स्वाराती रुग्णालयातील डॉक्टरांना प्रशिक्षण देते. रोटरी क्लब प्लास्टरचा खर्च करतो, डॉ. दीपक लामतुरे व त्यांची टीम मुलांवर उपचार करते, या बालकांना क्यूर इंडिया मोफत बूट देते, आजपर्यंत ५१ बालकांवर उपचार सुरु असून यातील 30 बालके पूर्णतः बरी झालेली आहेत, अशी माहिती स्वाराती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी दिली आहे क्लब फूट किंवा सीटीव्हीचे जे बच्चू असतात त्यांना जन्मताच पायामध्ये अपंगत्व आलेलं असत, आई वडिलांना जर अश्या पध्दतीने अपंगत्व असेल तर त्यांच्या मुलांमध्ये असं अपंगत्व येणाची दाट शक्यता असते लहान मुलं जन्मल्यानंतर सात दिवसानंतर उपचार करायला हवे, तीन महिने उशीर झाला तर असे बच्चू बरे होणार नाहीत त्यांचे पाय आहे तसेच वाकडे राहतात, लवकर उपचार केल्यास बिना ऑपरेशनचे पाय सरळ होतात यासाठी क्यूर इंडिया आम्हला मार्गदर्शन करते अशी माहिती अस्थीरोग विभागाचे प्रमुख डॉ. दीपक लामतुरे यांनी दिली आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com